# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. १५/०२/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक १५/०२/२००७ रोजी सभा सुचना क्र. २८ दि. ०८/०२/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ५) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ६) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १२) | श्री. परशुराम पद्‌माकर म्हात्रे | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| २) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ३) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ४) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी नगरसचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १९० चे वाचन केले.)

(मा. आयुक्तांनी मा. स्थायी समितीच्या मा. सभापती साहेबांना अंदाजपत्रक सादर केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १९१ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

मा. परिवहन समितीचे मा. सभापती श्री. उस्मान नुरले हे आता जे बजेट सादर केलेले आहे त्यावर स्वतःचे निवेदन सादर करित आहेत.

**उस्मान नुरले (परिवहन समिती सभापती) :-**

मा. स्थायी समितीचे सभापती श्री. स्टिवन जॉन मेन्डोसा साहेब सन्मा. स्थायी समिती सदस्य, सदस्या, मा. आयुक्त साहेब, कर्मचारी व अधिकारी वर्ग बी.पी.एन.सी. ॲक्ट १९४९ चे कलम ९७(क) अन्वये मा. परिवहन व्यवस्थापक यांनी सादर केलेले व्दितीय अंदाजपत्रक आवश्यक त्या दुरुस्त्या करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८(३) नुसार आपल्याकडे मंजुरीसाठी सादर करताना अतिशय आनंद होत आहे. सध्या ४० बसेस खाजगीकरणामार्फत सुरु असून त्यामध्ये वाढ करुन एकून ५० बसेस खाजगीकरणातून सुरु करण्याचा मानस आहे. तसेच, अंदाजपत्रकात २५ बसेस महानगरपालिकेच्या मालकीच्या असाव्यात. यासाठी देखिल तरतुद करण्यात आलेली आहे. नागरिकांवर जादा बोजा न पडता इतर मार्गानी उत्पन्न कसे मिळविता येईल यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत. मा. परिवहन समितीचे सन्मा. सदस्य, व्यवस्थापक व अधिकारी वर्ग यांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात असलेले तुट भरुन काढाण्यात यश प्राप्त झालेले आहे. भाईंदर ते ठाणे आणि भाईंदर ते

बोरीवली या मार्गाची परवानगी लवकरच मिळेल. त्यामुळे परिवहन सेवेची मोठ्या प्रमाणातील तुट भरुन निघणार आहे. तसेच, महानगरपालिका क्षेत्रातील असलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिवहन सेवा सुरु होण्यासाठी आपल्याकडे जे मोलाचे सहकार्य मिळाले ते सहकार्य यापुढेही परिवहन सेवा सुरळीत राहण्यासाठी आपल्याकडून मिळेल हीच अपेक्षा आहे. महापालिकेकडे परिवहन सेवेचे पालकत्व आहे. त्या दृष्टीकोनातून आणि हे बजेट सादर करत असताना या बजेटमध्ये १०० टक्के खाजगीकरणातून बसेस आपल्याजवळ आहेत. आपण ५० टक्के बसेसची तरतुद केलेली आहे आणि जी सबसीडी परिवहन सेवेने आपल्याकडे मागीतलेली आहे ती सबसीडी आपल्याकडून मिळेल अशी अपेक्षा बाळगतो आणि मी रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

**नगरसचिव :-**

महापालिकेचे मा. आयुक्त साहेब आताचे जे बजेट सादर केलेले आहे त्यावर स्वतःचे निवेदन करत आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. स्थायी समितीचे सभापती श्री. स्टिवन मेन्डोसा साहेब, सर्व सन्मा. सदस्य तसेच उपस्थित असलेले माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी वर्ग. सन २००६-०७ सुधारीत व २००७-०८ चे मुळ अर्थसंकल्प सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. शहरामध्ये झपाट्याने होणारी वाढ लक्षात घेता. औद्योगिकीकरण, शहर संगणीकरण व नागरी सेवा सुविधा यांना प्राधान्य देणे क्रमप्राप्त आहे. यासाठी उत्पन्न हा महत्वाचा घटक आहे. नागरिकांवर कराचा वाढीव बोजा न टाकता शहरासाठी महत्वांकांक्षी योजना राबवणे व नगारी सेवा सुविधा योजनांची अंमलबजावणी विहीत कालावधी करण्यासाठी शहराचा शहरविकास आराखडा व्हिज्युअली २०२५ चे सी.डी.पी. बनविण्यात आलेले असून त्यास शासनाची प्राथमिक स्वरुपाची मंजुरी देखिल प्राप्त झालेली आहे. सदर योजनेमध्ये केंद्र सरकारचे ३५ टक्के अनुदान, राज्यशासनाचे १५ टक्के अनुदान आणि महापालिकेचे ५० टक्के हिस्सा असा आर्थिक निकष आहे. केंद्र शासनाकडून ज्या योजनांसाठी अनुदान प्राप्त होईल, त्याप्रामणात महानगरपालिकेचा हिस्सा राखीव ठेवणे आवश्यक आहे. यासाठी सदर अंदाजपत्रकामध्ये भांडवली कामामध्ये काटकसर करुन महापालिकेच्या हिस्सांच्या रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे. लोकाभिमुख प्रशासनासाठी सुरु करण्यात आलेली नागरी सुविधा केंद्र या वर्षात लॅन व वॅन ने जोडण्यात येणार असून सदरची कार्यवाही करणारी महाराष्ट्रातली मिरा भाईंदर महानगरपालिका ही पहिली महानगरपालिका आहे. तसेच, सर्व विभाग संगणकीकृत करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, सर्व विभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती या आर्थिक वर्षापासून मंत्रालयातील धर्तीवर पंचिंग मशिनद्वारे करण्यात येणार आहे. या अर्थसंकल्पातील ठळक बाबींमध्ये मालमत्ता कर, जकात कर, पाण्यावरील कर, विशेष शिक्षण कर विकास बाजार फी नवीन नळजोडणी अग्नीशमन सेवा कर, वृक्ष कर, कर्ज उभारणी आहेत. अशाप्रकारे मालमत्ता करामध्ये ३७.५० कोटी रु. जकात करामध्ये ७१.७७ कोटी रु., पाण्यावरील करामध्ये २९.३५ कोटी रु., विशेष शिक्षण कर ९.३५ कोटी रु., विकास कर ११ कोटी रु., बाजार फी २.६४ कोटी रु. नविन मंजुर ५ कोटी रु., अग्निशमन सेवा कर १.३५ कोटी रु., वृक्ष कर १.३५ कोटी रु., कर्ज उभारणी ७३.५० कोटी रु. ह्याच्यामध्ये खर्चाच्या ठळक बाबी आपणासमोर आणू इच्छितो. नविन वस्ती म्हणजे, बी.पी. रोडमध्ये जे विकास आराखड्यातील रस्ते आहेत. त्याच्यासाठी ४२ कोटी रु. ची तरतुद केलेली आहे. भुयारी गटार योजनेसाठी १० कोटी रु. ची तरतुद केलेली आहे आणि भाईंदर पूर्व-पश्चिम सबवेसाठी ५ कोटी रु. ची तरतुद केलेली आहे. नविन कचरा व्यवस्थापन ह्यासाठी ४.९५ कोटी रु. प्रभाग कार्यालय इमारत बांधकामसाठी १ कोटी रु., हॉस्पीटल जागा संपादन यासाठी ७ कोटी रु. नगरभुमापनसाठी १.३२ कोटी रु., संगणक २.३० कोटी नवीन फायर फायटर खरेदी ५.६० कोटी, वृक्षप्राधिकरण २.३५ कोटी पाणीपुरवठा व मलनिःसारण ११.५० कोटी, परिवहन सेवा अनुदान ३.५० कोटी रु. ची तरतुद केलेली आहे. वृक्षप्राधिकरण- महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षांचे संवर्धन संरक्षण करणे, सामाजिक वनीकरणाद्वारे पर्यावरणाचा संतुलन राखण्यासाठी वृक्ष संवर्धन समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्याकरिता २ कोटी ३५ लाख रु. अर्थसंकल्पामध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. आरक्षणातील रस्ते विकसित करण्यासाठी मगाशी आपल्याला सांगितल्याप्रमाणे, त्यामध्ये ४२ कोटी रु. ची तरतुद केलेली आहे. त्याचप्रमाणे अग्निशमन दल आहे, नगरसेवक स्वेच्छानिवृत्तीसाठी सुध्दा आपण २ कोटी ५८ लाख रु. ची तरतुद केलेली आहे. दुर्बल घटक महिला व बालल्याणसाठी व महापालिका क्षेत्रातील दुर्बल घटक, मागासवर्गीय वसाहती यासाठी प्राथमिक सेवा व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच महिला व बालसंगोपनासाठी शासन नियमाप्रमाणे नगरपालिकेची महसुल उत्पन्नातील अत्यावश्यक खर्च वजा जाता उर्वरित उत्पन्नावर प्रत्येकी ५ टक्के इतकी रक्कम अर्थसंकल्पातील तरतुद म्हणून रक्कम रु. ३२ लाख इतकी तरतुद आहे.

प्राथमिक शिक्षणासाठी जे ५० टक्के अनुदानापुरते आपल्याला द्यावे लागतात. त्याच्यासाठी २ कोटी ६६ लाख रु. ची तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधून जास्तीत जास्त नागरी सेवा, सुविधा पुरवून लोकाभिमुख प्रशासन देण्याचा आपला मानस आहे. सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मुर्त स्वरुपात आणण्यासाठी प्रशासनाला सन्मा. पदाधिका-यांचे सहकार्य लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपले दोन शब्द संपवतो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त साहेबांनी आता जे बजेट सादर केलेले आहे. ते मी स्विकारले आहे. ह्याच्यानंतर आपण ह्याची चर्चा करु. असे मी तुम्हाला सुचना करतो.

**नगरसचिव :-**

मा. सभापतींच्या परवानगीने आपण हे बजेट स्विकारलेले आहे. त्याच्या चर्चेसाठी आपण २२, २३, २४ तारीख निश्चित करु या. २० तारखेला महासभा आहे. २२, २३, २४ गुरुवार, शुक्रवार, शनिवार असे तीन दिवस बजेटच्या चर्चेसाठी ठेवायचे आहेत. तसेच तीन दिवस प्रशासकीय अधिका-यांनी उपस्थित रहायचे आहे आणि वेळापत्रकाप्रमाणे २४ तारखेला सुट्टी आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही बजेटची चर्चा २२, २३ तारखेला घेत आहे. महासभा २० तारखेला होउन जाते.

**नगरसचिव :-**

ही महासभा पुन्हा मध्येच येणार आहे. आपण चर्चा करु पण ती प्रिंट व्हायला आठवडा लागेल.

**मा. सभापती :-**

तरी किती दिवस लागतील?

**नगरसचिव :-**

प्रिंट व्हायला पाच-सहा दिवस लागतील.

**मा. सभापती :-**

आजची बजेटची मिटींग संपली असे जाहीर करतो.

**सभा संपल्यची वेळ :- दुपारी १२.०० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**